Dharangaon Police Station Dist. Jalgaon

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** धरणगांव **Year (वर्ष):** 2023
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0036 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/01/2023 19:34 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 26/01/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 26/01/2023
**Time From (वेळेपासून):** 14:51 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:25 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/01/2023 **Time (वेळ):** 19:14 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 014 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/01/2023 19:14 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 2 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पाटाजवळ असलेल्या सिंधु ढाबा सम, धरणगांव ते चोपडा रोडवरिल ,धरणगांव

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** धरणगांव
**District(State) (जिल्हा(राज्य)):** जळगाव(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
**(a) Name (नाव):** किशोर प्रताप पाटील
**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1974 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गारखेडा ,ता धरणगांव,धरणगांव ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गारखेडा ,ता धरणगांव,धरणगांव ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल नारायण गायकवाड | | | 1. प्रथमिक आरोग्य केंद्राजवळ,चहार्डी ,ता चोपडा,धरणगांव ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | (त्यात व 500/ रू.दराच्या 5चलनी नोटा ) | 2,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 2,500.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यावेळी आम्ही पो.ठा.अ.पो.ना.99 प्रदिप पवार नोंद करतो की, अँन्टी करप्शन ब्यूरो, जळगांव यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम अन्वयेची लेखी फिर्याद पोलीस स्टेशनला हजर केल्याने मा. पोलीस निरिक्षक धरणगांव पोलीस स्टेशन यांच्या आदेशाने खालीलप्रमाणे गुन्हा रजी.दाखल करीत आहोत.1)धरणगांव पो.स्टे. भाग -6 गुरनं. /2023 भ्रष्टाचार प्रतिबंधक (सुधारीत) कायदा सन 1988 चे कलम 7 प्रमाणे2) फिर्यादीचे नाव किशोर प्रताप पाटील वय 49व्यवसाय शेती रा. गारखेडा , पोस्ट, धानोरा ता.धरणगांव, जि. जळगांव3) आरोपीचे नाव 1) अनिल नारायण गायकवाड वय50वर्ष व्यवसाय -नोकरी, ग्रामसेवक गारखेडा- बाभळे गृप ग्रामपंचायत ता. धरणगांव जि. जळगांव रा.प्रथमिक आरोग्य केंद्राजवळ, चहार्डी ता.चोपडा जि. जळगांव.4) अप.घ.ता.वेळ व ठि - दि.26/01/2023 रोजी 14.51 वा. धरणगांव ते चोपडा रोडवरिल पाटाजवळ असलेल्या सिंधु ढाबा समोरील रसवंती जवळ .5) लाचेची मागणी -प्रथम 3000/- रु. व तडजोडी अंती 2500/-रुपये.6) हस्तगत लाचेची रक्कम - 2500/-रु. (त्यात व 500/- रू.दराच्या 5चलनी नोटा )7) गुन्ह्याची थोडक्यात हकीगत :- यातील तक्रारदार यांना सन- 2015 ते 2022 या कालावधीतील गृप ग्रामपंचायत गारखेडा मार्फतीने करण्यात आलेल्या कामाचे ऑडीट रिपोर्ट मिळणे कामी गृप ग्रामपंचायत गारखेडा येथे आलोसे यांचे कडेस दि.29/10/2022 रोजी माहिती अधिकार कायद्याखाली अर्ज केला होता. परंतु माहिती अधिकार कायद्यान्वये माहिती देण्याची मुदत संपुन देखिल आलोसे यांनी तक्रारदार यांना माहिती दिली नाही.दि.25/01/2023 रोजी तक्रारदार यांनी ग्रामसेवक अनिल नारायण गायकवाड यांना भेटुन माहितीचा अधिकार कायद्यान्वये त्यांनी केलेल्या अर्जाची माहिती बाबत विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांना तुम्हाला जर लवकरात लवकर माहिती हवी असेल तर तुम्हाला मला 3000/- रुपये द्यावे लागेतील असे सांगुन लाच रकमेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालयाकडे दि.26/01/2023 रोजी लेखी तक्रार दिली होती. सदर तक्रारीच्या अनुशंगाणे अँन्टी करप्शन ब्युरो जळगांव पथकाने दि.26/01/2023 रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता यातील मनुद आलोसे अनिल नारायण गायकवाड यांनी तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार कायद्यान्वये मागणी केलेल्या ऑडीट रिपोर्टची माहिती देण्याचे मोबदल्यात पंचासमक्ष प्रथम 3000/- रुपये लाच रकमेची मागणी करुन तडजोडीअंती 2500/- रुपये लाच रक्कम आलोसे यांनी वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी स्वता स्विकारली म्हणुन गुन्हा वगैरे मजकुरचे तक्रार वरुन गुन्हा रजीस्टरी दाखल करीत असुन सदर गुन्ह्याची टंखलिखीत फिर्यादची प्रत यासोबत जोडली आहे. सदर गुन्ह्याचा खबरी रिपोर्ट मा.कोर्टात पाठवीत आहोत.व सदर गुन्ह्याचा स्पेशल रिपोर्ट वरीष्टांना इमेलद्वारे पाठवीत असुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास श्री. एस. के. बच्छाव, पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन ब्यूरो, जळगांव हे करीत आहेत.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): ~~Khushal nago patil~~ एस.के.बहराव (A.C.B. जळगाव)
**Rank** (पद): HC (Head Constable)
**No.**(क्र.): PCMH83645 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची
**Name** (नाव): Amol Kisan Gunjal
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): DCPS15101000402AK6M8601M

Dharangaon Police Station Dist. Jalgaon
पोलीस उप निरीक्षक धरणगाव पोलीस स्टेशन

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

फिर्याद

धरणगांव पोलीस स्टेशन
दिनांक २६.०१.२०२३

मी किशोर प्रताप पाटील, वय ४९ वर्ष,व्यवसाय–शेती,रा.गारखेडा,पोस्ट धानोरा,ता.धरणगाव,जि.जळगांव.

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे पत्नी व मुलाबाळांसह राहतो. दि.२५.०१.२०२३ रोजी मी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगाव कार्यालयात जाऊन पोलीस उपअधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांचेशी संपर्क साधुन अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील यांचे समक्ष हजर राहून त्यांचे कडेस गारखेडा, बाभळे गावाच्या गृप ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांनी माझे कडेस लाच रक्कमेची मागणी केली आहे. त्या संदर्भात मला आपणाकडेस तक्रार द्यायची आहे. सदर लोकसेवकाने मला दि.२६.०१.२०२३ रोजी सकाळी भेटायला बोलविले आहे असे सांगितले. त्यानंतर मी पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांना दि.२६.०१.२०२३ रोजी सकाळी ०९.३० वा. धरणगांव ते अमळनेर रोडलगत असलेल्या शेताजवळील दत्त मंदिरा जवळ भेटणार असल्याचे कळविले होते.

त्याप्रमाणे आज दि.२६.०१.२०२३ रोजी सकाळी ०९.३० वा.मी माझे स्वत:चे मोटार सायकलसह धरणगांव ते अमळनेर रोडलगत असलेल्या शेताजवळील दत्त मंदिरा जवळ उपस्थित होतो. तेव्हा एक महिंद्रा कंपनीची मोरॅन्झो वाहन माझे जवळ येवुन थांबले व सदर वाहनात असलेले श्री.पाटील साहेब यांनी मला सदर वाहनात बसवुन घेतले. त्यांनतर श्री. पाटील साहेब यांनी वाहनात उपस्थीत असलेले पोलीस निरीक्षक एस.के.बच्छाव साहेब यांची सापळा अधिकारी म्हणुन ओळख करुन दिली त्यानंतर वाहनात उपस्थित असलेले दोन शासकीय पंच, सापळा पथकाचे कर्मचारी व माझी आपआपसात ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझी तक्रार पोलीस निरीक्षक श्री.एस.के.बच्छाव साहेब,दोन्ही पंच व सापळा पथका समक्ष कथन केली. त्यानंतर मी माझी तक्रार स्वत:चे हस्ताक्षरात को–या कागदावर लिहून दिली ती खालील प्रमाणे आहे.

धरणगांव पो स्टे
भाग- ६ गु.र.नं
३६/२०२३
भ्रष्टा. प्रति.
अधि. कलम
१९८८ चे क.
७ प्रमाणे
स्टे. डा. नों. नं
१४ वर
११।१४
वाजता
दिनांक
२६।०१।२०२३
दोषारोपदार
(PN99)
[stamp: ... धरणगांव पोलीस स्टेशन]

समक्ष हजर राहुन तक्रार लिहुन देतो की, मी वरील ठिकाणी माझी पत्नी सौ.साधना पाटील व दोन मुलांसह राहवायास आहे. माझे दोन्ही मुले शिक्षण घेत असुन, आमच्या मालकीची शेती गारखेडा गावात असुन मी स्वत: शेती व्यवसाय करुन त्यावर आपल्या कुंटूंबाचा उदरनिर्वाह करतो. मी राहत असलेल्या गारखेडा गावाची व त्या शेजारी असलेल्या बाभळे गावाची संयुक्त गृप ग्रामपंचायत असुन ती गारखेडा,ता.धरणगाव,जि.जळगाव येथे आहे. माझी पत्नी सौ. साधना पाटील हया सन २०२० पासुन सदर ग्रामपंचायतीमध्ये उपसरपंच या पदावर कार्यरत आहे. सदर ग्रामपंचायतीमध्ये सौ.संगीता भास्कर पाटील हया सरपंच असुन, अनिल नारायण गायकवाड हे ग्रामसेवक पदावर कार्यरत आहे.

सन २०१५ ते २०२२ या कालावधीमधील गृप ग्रामपंचायत गारखेडा मार्फतीने करण्यात आलेल्या कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा मला संशय असल्याने त्याबाबत तक्रारी अर्ज करण्यासाठी सदर कालावधीमध्ये केलेल्या शासकिय योजनांच्या कामाचे ऑडीट रिपोर्टची माहीती मला हवी असल्याने मी दि.२९.१०.२०२२ रोजी ग्रुप ग्रामपंयात गारखेडा येथील कार्यालयात जाऊन ग्रामसेवक अनिल नारायण गायकवाड यांचे कडेस महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम सन २००५ अन्वये माहीती मिळणे कामी मी स्वत: जावुन रितसर अर्ज सादर केला होता. सदरचा अर्ज ग्रामसेवक अनिल गायकवाड यांनी स्वत: स्विकारुन, ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय गारखेडा नावाचा शिक्का मारुन मला साक्षांकित करुन स्थळप्रत दिली होती.

मी माहितीचा अधिकार अर्जान्वये मागीतलेली माहिती मला १ महिन्याच्या कालावधीत देणे गरजेचे होते. परंतु सदर माहिती अधिकार अर्जाची माहिती पुरवण्याची १ महिन्याची मुदत संपुन देखील ग्रामसेवक अनिल नारायण गायकवाड यांनी मला माहिती न दिल्याने मी ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन त्यांची समक्ष भेट घेऊन त्या बाबत विचारणा केली असता त्यांनी आज देतो, उद्या देतो असे सांगुन विलंब करत होते.

त्यानंतर दिनांक २५.०१.२०२३ रोजी मी ग्रामसेवक अनिल नारायण गायकवाड यांना भेटुन माहितीचा अधिकार कायाद्यान्वये केलेल्या अर्जाची माहिती मागणी करुन त्यांना ''तुम्ही जर मला माहिति देणार नसाल तर मी अपीलात जाऊन माहिती मागवितो'' असे सांगीतले असता त्यांनी मला, सांगीतले की, ''तुम्हाला जर लवकरात लवकर माहिती हवी असेल तर तुम्हाला मला ३,०००/– रुपये द्यावे लागतील'' असे सांगीतले. त्यावरुन ग्रामसेवक अनिल नारायण गायकवाड हे मी माहिती अधिकाराखाली मागीतलेली माहिती पुरविण्याचे मोबदल्यात माझ्याकडेस ३,०००/– रुपयाची मागणी करित असल्याचे माझे लक्षात आले. तेव्हा मी त्यांना आता माझे कडे पैसे नाहीत मी तुम्हाला नंतर येऊन भेटतो असे सांगुन सदर ठिकाणावरुन निघुन आलो होतो.

मी जर ग्रामसेवक अनिल नारायण गायकवाड यांचे मागणी प्रमाणे त्यांना ३,०००/–रुपये दिले नाही तर ते मला मी माहिति अधिकार कायद्यान्वये मागीतलेली माहिती लवकर देणार नाहीत व माहीती देण्यास विनाकारण विलंब करतील म्हणुन मी त्यांना नाईलाजास्तव लाच रक्कम देण्यास तयार झालो. मला ग्रामसेवक अनिल नारायण गायकवाड

[signature] PI

[signature]

यांना लाच देण्याची मनापासुन ईच्छा नाही. म्हणुन मी आज रोजी ग्रामसेवक अनिल नारायण गायकवाड यांचे विरुध्द ते मागत असलेल्या लाच रकमे बाबत लेखी तक्रार देत आहे. तरी त्यांच्यावर कारवाई करावी.

त्यानंतर पो.नि. बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्रं.१ यांना पडताळणी कारवाई बाबत महत्वाच्या सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी सापळा पथकातील पोना/ईश्वर धनगर यांचे जवळ असलेल्या सापळा ट्रॅप बॅगेतील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन त्यात माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर बच्छाव साहेब यांचे सुचनेनुसार पोना/ईश्वर धनगर यांनी सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात दिसणार नाही अशा पध्दतीने लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्रं.१ यांचेसह ग्रामसेवक अनिल गायकवाड यांची भेट घेण्यासाठी धरणगाव ते चोपडा रोडवरिल पाटाजवळ असलेल्या सिंधु ढाबा येथे माझे मोटार सायकलसह पाठविले. तेव्हा मी पंच क्रं १ यांचेसह धरणगाव ते चोपडा रोडवरिल पाटाजवळ असलेल्या सिंधु ढाबा येथे पोहचलो. सदर ठिकाणी ग्रामसेवक अनिल गायकवाड हे नाश्ता करित होते. त्यावेळी त्यांचेत व माझ्यात माझेत मी केलेल्या माहिती अधिकार अर्जाचे संदर्भात व ईतर आवांतर चर्चा झाली. सदर चर्चे दरम्यान ग्रामसेवक अनिल गायकवाड यांनी मला **''५ पैशावर सुध्दा तुमचे काम करुन देईल, तुमच्या खुशीने जे द्यायचे असतील ते द्या''** असे सांगुन मला **त्यांचे हाताची तिन बोटे दाखवुन ''हाई ईतला लई या''** असे सांगुन पैशांबाबत ईशारा केला. त्यावेळी मी त्यांना **''साला एटीएम मं जाएल शे, तो आला की घेवुन येतो''** वैगरे बोलुन मी व पंच क्र.१ असे माझ्या मोटर सायकलीने सापळा पथकाजवळ परत आलो होतो.

त्यानंतर माझेत व ग्रामसेवक अनिल गायकवाड यांचेत झालेले संभाषण दोन्ही पंचानी,बच्छाव साहेब व सापळा पथकाने ऐकले. त्यानंतर पोलीस निरिक्षक बच्छाव साहेब यांनी पंच क्र. १ यांना घडलेली हकीकत विचारली असता पंच क्र. १ यांनी सांगीतले की, तक्रारदार व ग्रामसेवक यांच्यात त्यांच्या कामाविषयी चर्चा होवुन पैशाबाबत तुम्ही सांगा,तुम्ही सांगा असे मोघम पैशा विषयी बोलणे होवुन, **''ग्रामसेवक अनिल गायकवाड यांनी तक्रारदार यांना त्यांचे उजव्या हाताची तिन बोटे दाखवुन ईशारा केला. परंतु पैसे मागणीचा स्पष्ट उल्लेख केला नाही''** असे सांगीतले. म्हणुन पोलीस निरिक्षक बच्छाव साहेब यांनी पैसे मागणी बाबत स्पष्ट उल्लेख व किती रक्कम मागीतली या बाबतचा उल्लेख संभाषणात आला नसल्याने पुन्हा मला पंच क्र. १ यांचेसह ग्रामसेवक अनिल गायकवाड यांची भेट घेण्यासाठी धरणगाव ते चोपडा रोडवरिल पाटाजवळ असलेल्या सिंधु ढाबा येथे माझे मोटार सायकलसह पाठविले.

त्याप्रमाणे मी व पंच क्र.१ पुन्हा ग्रामसेवक अनिल गायकवाड यांची भेट घेण्यासाठी सिंधु ढाबा येथे गेलो. तेथे ग्रामसेवक अनिल गायकवाड हे हजर होते. तेव्हा त्यांनी मला **''इतला टाईम''** असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना म्हणालो **''बयना आपला पैसा हुईसन पैसा देत नही तो, त्याले म्हंत आप्पा ले तिन हजार रुपये देना हे त, नही म्हणे, मना पैसा नही येतस म्हने आते, त्या कपाशीवाल्याकडुन लई येस मग आप्पा अडीच हजार, तो त्याना साडु हे त्याना पासुन आणिसन देन पडीन तुम्हले''** असे म्हणुन ग्रामसेवक यांचेशी मी त्यांनी बोटांनी ईशारा करुन मागणी केलेल्या पैशाच्या रकमे विषयी बोललो असता तेव्हा ग्रामसेवक यांनी **''हा, पुरा तिन करी लई या''** असे सांगुन माझेकडे लाच रकमेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच क्र.१ असे माझ्या मोटर सायकलीने सापळा पथकाजवळ परत आलो.

त्यानंतर पोलीस निरीक्षक बच्छाव साहेब, दोन्ही पंच व सापळा पथकाने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये आमच्यात झालेले संभाषण ऐकले. तेव्हा ग्रामसेवक अनिल गायकवाड यांनी माझ्याकडेस ३,०००/– रुपयांची मागणी करुन २,५००/– रुपये घेण्याची संमती दर्शविल्याने पोलीस निरीक्षक बच्छाव साहेब यांनी पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरवले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक बच्छाव साहेब यांनी मला ग्रामसेवक अनिल गायकवाड यांना देण्यासाठी लाच रक्कम हजर करणे बाबत सांगीतल्याने मी माझे घर खर्चातुन आणलेले २,५००/– रुपये (त्यात ५००/–रू.दराच्या ५ चलनी नोटा) बच्छाव साहेब यांचे समक्ष हजर केले. तेव्हा बच्छाव साहेब यांचे सुचनेनुसार पोना/ईश्वर धनगर यांनी सदर नोटांना अ.पावडर लाउन सदर नोटांची घडी केली. त्यानंतर बच्छाव साहेब यांचे सुचनेनुसार पोना/ईश्वर धनगर यांनी २,५००/– रुपये माझे शर्टचे पुढील उजव्या खिश्यात अलगद ठेवुन दिली होती.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्रं.१ यांना पुन्हा महत्वाच्या सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांचे सुचनेनुसार पोना/ईश्वर धनगर यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन मेमरी कार्ड टाकुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात दिसणार नाही अशा पध्दतीने लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्रं.१ यांचेसह ग्रामसेवक अनिल गायकवाड यांना २,५००/–रु.लाच रक्कम देण्यासाठी माझे मोटार सायकलने धरणगाव ते चोपडा रोडवरिल पाटाजवळ असलेल्या सिंधु ढाबा येथे पाठविले होते. त्यानंतर मी पंच क्र.१ यांचे सह माझे मोटार सायकलने धरणगाव ते चोपडा रोडवरिल पाटाजवळ असलेल्या सिंधु ढाबा येथे गेलो. तेव्हा मी ग्रामसेवक अनिल गायकवाड यांना मी माहिती अधिकारात मागणी केलेल्या ऑडीट रिपोर्ट संदर्भात बोलणी करित असतांना त्यांनी **''ऑडीट रिपोर्ट, सोमवार ले कर देस न, सोमवारले तर पहिले तुम्हना कामले प्राधान्य''** असे म्हणुन त्यांनी म्हणुन **त्यांचे उजव्या हाताचे पहिले बोट व अंगठयाने मला पैसे आणले बाबतचा ईशारा केला.** तेव्हा मी माझे शर्टाचे पुढील उजव्या बाजुचे खिशात असलेली लाच

२,५००/– रुपये बाहेर काढुन ती ग्रामसेवक अनिल गायकवाड यांचे समोर धरली असता त्यांनी ती त्यांचे उजव्या हाताने स्विकारली. त्यावेळी मी त्यांना **"अरे कपडा मा घाला"** असे पैशांविषयी बोलला असता त्यावर ते **"तुम्ही का परका हेत मले फसवणार हेत"** असे म्हणुन त्यांनी परिधान केलेल्या जिन्स पॅटचे पुढील उजव्या बाजुचे खिशात ठेवुन घेतली. त्यानंतर मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास ईशारा केला. तेव्हा बच्छाव साहेब व सापळा पथक यांनी ग्रामसेवक अनिल गायकवाड यांना रंगेहाथ पकडले. त्यांनतर सापळा पथकातील सदस्यांनी लागलीच ग्रामसेवक अनिल गायकवाड यांना ताब्यात घेतले. त्यानंतर बच्छाव साहेब यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा बच्छाव साहेब यांनी ग्रामसेवक अनिल गायकवाड यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी ग्रामसेवक अनिल गायकवाड यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव अनिल नारायण गायकवाड, वय ५०, व्यवसाय नोकरी, ग्रामसेवक, गारखेडा–बाभळे ग्रुप ग्रामपंचायत,ता. धरणगाव,जि.जळगाव,रा. प्राथमीक आरोग्य केंद्राजवळ,चहार्डी,ता.चोपडा,जि.जळगाव असे सांगितले.(खाते जिल्हा परिषद वर्ग–३) असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगाव कार्यालयामध्ये जाऊन पुर्ण करण्यात आली. त्या बाबत सविस्तर पंचनामा केला आहे.

तरी ग्रामसेवक अनिल नारायण गायकवाड यांनी मी केलेल्या माहिती अधिकाराच्या अर्जातील सन २०१५ ते २०२२ या कालावधी मधील केलेल्या शासकिय योजनांच्या कामाचे ऑडीट रिपोर्टची माहीती देण्याचे मोबदल्यात माझे कडेस दि.२६.०१.२०२३ रोजी प्रथम ३,०००/–रुपये लाचेची मागणी करुन, २,५००/– रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी सांगितल्या प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली ती मी सांगितल्या प्रमाणे टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

**समक्ष**

एस.के.बच्छाव
पोलीस निरिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

**फिर्यादीची सही**
दि.२६.०१.२०२३